राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर जि. चंद्रपूर

राष्ट्रीय सेवा योजना

शिबिर अहवाल 2025-26

दि. 24 डिसें. ते 30 डिसें 2025 मौजा शिरपूर तह. चिमूर

गांधी सेवा शिक्षण समिती द्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकानी मौजा शिरपूर तालुका चिमूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे जनक 24 डिसेंबर ते 30 डिसेंबर 2025 या काळात आयोजन करण्यात आले होते. हे विशेष श्रमसंस्कार शिबिर "लोकसहभागातून स्वयंपूर्ण ग्रामविकास" या संकल्पनेवर आधारित होते.

शिबिराचे आयोजन करण्यापूर्वी मोजा शिरपूर गावाचा सर्वे करण्यात आलेला होता. मिळालेल्या माहितीनुसार गावाची लोकसंख्या 1770 एवढी आहे. या गावात अनेक अतिक्रमण वाढलेले, शौचालय अल्प प्रमाणात, गावातील कच्चे रस्ते, जलसिंचनाचा पुरेसा प्रसार नाही असे दिसून आले. म्हणून लोक सहभागातून ग्रामविकास 100 स्वयंसेवकांनी करावयाचे ठरवले. त्याच गावातील सरपंच श्री. जयपाल गावतुरे, ग्रामविकास अधिकारी श्री. मंगेश लोकचंद भसारकर यांनी सहकार्य केले.

दिनांक 25 डिसेंबर 2025 –

- सकाळी 6.00 ते 7.30 वाजता लोकशाही सुशासन सन्मान रॉली संपूर्ण शिरपूर गावात काढण्यात आली. सरपंच श्री जयपाल गावतुरे, उपसरपंच श्री राजेश भानारकर, ग्रामविकास अधिकारी श्री लोकचंद भासारकर उपस्थित होते रॉलीस गावातील लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

- सकाळी 8.00 ते 10.00 वा. ग्रामपंचायत कार्यालय गावातील शिपणपायली रोड स्वच्छ केला. परिसर स्वच्छतेत गावातील नागरिकांचा सहभाग होता.
- सकाळी 11 वाजता रासेयो शिबिराचे उदघाट्न संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गांधी सेवा शिक्षण समितीचे कोषाध्यक्ष प्रा. महादेवराव पिसे होते. उदघाटक डॉ. ईश्वर मोहुर्ले, प्राचार्य शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महा. अर्जुनी मोरगाव हे होते. सोबतच उपसरपंच राजेंद्र भानारकर, ईश्वर लेनगुरे, सौ. सुनीता कुमरे, सौ. पूजा राजू कापगते, सौ. लता काळसर्पे ग्रा. प. सदस्य उपस्थित होते.
- सायंकाळी 6.00 वाजता श्री. दिवाकर डहाळे श्री. गुरुदेव भक्त शिरपूर यांनी सामुदायिक प्रार्थना वरती चिंतन केले.

दिनांक 26 डिसें. 2025-

- सकाळी 6.00 वाजता राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा योगाभ्यास, शारीरिक कसरत, व्यायाम घेण्यात आले. शारीरिक संचालक डॉक्टर उदय मेंढुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळचे सत्र संपन्न झाले.
- सकाळी 8 ते 11 वाजता मौजा शिरपूर गावातील श्रमदान करण्यात आले. त्यात गावातील अतिक्रमण मोठ्या प्रमाणात होते. सरपंच श्री जयपाल कावतुरे लोकचंद भासारकर यांच्या मार्गदर्शनात काढण्यात आले. गावातील लोकांनी प्रतिसाद दिला.
- राष्ट्रसंतांचा युवकांना संदेश या बौद्धिक सत्रात ग्रामविकास अधिकारी लोकचंद भसारकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच वंदनी राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यावर आधारित अभंग म्हटले. राष्ट्रीय सेवा युद्ध स्वयंसेवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉक्टर राजेश्वर रहांगडाले होते. सूत्रसंचालन कु. साक्षी आवारी हिने केले. आभार कु. प्रियंका भजभूजे हिने केले.

- सायंकाळी 6 वाजता मा. श्री. मंगेश भानारकर, पोलीस पाटील ग्रा. प. शिरपूर यांचे सामुदायिक पार्थनेचे महत्व या विषयावर चिंतन झाले. गावातील श्री. गुरुदेव भक्ताची उपस्थिती होती.
- सायंकाळी 7.00 वाजता रा.से.यो. स्वयंसेवकांनी विविध ग्रुपच्या ग्रुप लीडरनी अहवाल वाचन केले.
- रात्री 8 ते 10 या काळात रा.से.यो. स्वयंसेवकांनी सामाजिक प्रबोधनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

दिनांक 27 डिसें. 2025

- सकाळी 6 वाजता योगा व झुम्बा डॉन्स चे आयोजन करण्यात आले. डॉ. उदय मेंढूलकर यांनी युवकांच्या जीवनात व्यायामाचे महत्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.
- सकाळी 8 ते 10 काळात रा. से. यो. स्वयंसेवकांनी गावातील अतिक्रमण, मुख्य नाली सफाई व रस्त्याचे काम केले. यावेळी गावातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.
- दुपारच्या सत्रात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या सत्रात मुख्य विषय 'महिला सुरक्षा धोरण आणि उपाययोजना' हा विषय होता. वक्ते म्हणुन माननीय श्री. दिनेश लबडे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चिमूर हे होते. सौ वैशाली निकोडे, सुनीता कुमरे, ईश्वर लेनगुरे इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचालन आतिष सातपुते, प्रास्ताविक डॉ. राहंगडाले, आभार करण डहारे यांनी मानले.
- सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व चिंतन या विषयावर श्री. विशाल रमेश गावतुरे यांनी मार्गदर्शन केले.
- राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अहवाल वाचन करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

दिनांक 28 डिसें. 2025

- सकाळी 6 वाजता डॉ. उदय मेंढूलकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना योगाचे विविध प्रकार प्रात्यक्षिक करून दाखवले त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी प्रत्यक्षात केले.
- सकाळी 8.00 ते 10.00 या काळात मौजा शिरपूर येथील मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला नालीचे खोदकाम करण्यात आले. सरपंच श्री. जयपाल गावतुरे, उपसरपंच श्री. राजेश भानारकर, ग्रामविकास अधिकारी लोकचंद भासारकर यांच्या मार्गदर्शना श्रमदान करण्यात आले.
- दुपारी 2.00 ते 4.30 या सत्रात बौद्धिक कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले होते. 'ग्रामविकासात लोकसहभाग' या विषयावर डॉ. प्रशांत इंदूरकर, अनिकेत समाजकार्य महा. वडसा जि. गडचिरोली यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक अनिकेत सावसाकडे, प्रास्ताविक डॉ. पी. एम. राजूरवाडे, आभार कु. जानवी ढोणे हिने केले.
- सायंकाळी सहा वाजता मा. एकनाथ बोरकर यांनी सामुदायिक पार्थना व चिंतन या विषयावर राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दिनांक 29 डिसें. 2025

- सकाळी सहा ते सात या काळात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मैदानी खेळ व्यायाम केला. मौजा शिरपूर गावातील प्लास्टिक निर्मूलन स्वयंसेवकांनी केले. गावात जाऊन प्लास्टिक मुक्त ग्रामाचा प्रचार प्रसार केला. या उपक्रमात गावातील लोकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

- सकाळी 9 ते 12 दरम्यान मौजा शिरपूर ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी डॉक्टर वैष्णवी कामळी, प्राथमिक आरोग्य केंद्र, नेरी तालुका चिमूर यांच्या नेतृत्वात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. त्यांच्यासोबत डॉक्टर सतीश वाघे, सौ. सविता कोवे, श्री. विशाल दोडके, सौ. वंदना कोसे, सौ. ममता गावतुरे, यांनी गावातील 350 लोकांची सिकलसेल, मधुमेह, हृदयविकार रोगांची तपासणी केली. सोबतच 100 रासेयो स्वयंसेवकांनी आपल्या आरोग्याची तपासणी केली.

  आरोग्य तपासणी सोबतच गावातील गायी, गुरे म्हशी शेळ्या यांचीही तपासणी करण्यात आली. ही तपासणी हे पशुवैद्यकीय शिबिर डॉ. राहुल थेटे, डॉ. गणेश राठोड, डॉ. महेश आसूटकर, डॉ. दत्ता केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केली होती. 122 पशुपालकांनी या तपासणीत सहभाग घेतला.
- दुपारी 2.30 ते 4.00 या बौद्धिक क्षेत्रात 'मुख्यमंत्री पंचायतराज समृद्ध ग्राम योजना' या विषयावर व्याख्यान झाले. प्रमुख वक्ते म्हणून श्री नितीन फुलझले, गटविकास अधिकारी पंचायत समिती चिमूर, आकाश कवाडे ग्रामपंचायत अधिकारी इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. जयपाल गावतुरे, सरपंच ग्रामपंचायत शिरपूर हे होते.
- सायंकाळी 4.30 ते 6.00 या काळात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी ग्राम सर्वेक्षण केले. त्यात शिक्षणाची स्थिती, आरोग्य, व्यसनाधीनता, दारिद्र्यता याची माहिती प्राप्त झाली. श्री. दिनेश कामठे गुरुदेव सेवा मंडळ शिरपूर यांचे सामुदायिक पार्थना व चिंतन यावर मार्गदर्शन झाले.
- राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी दिवसभरातील केलेल्या कार्याचा अहवाल वाचून दाखविला व सामाजिक प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

दिनांक 30 डिसें. 2025

- सकाळी मौजा शिरपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी रामधून काढली. ग्रामगीतेचा गावागावात प्रचार प्रसार व्हावा यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी प्रबोधन केले. या रामधुणेकरीता समस्त शिरपूर ग्रामस्थांनी उदंड प्रतिसाद दिला.
- सकाळी 11.30 वाजता समारोपीय समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गांधी सेवा शिक्षण समिती सचिव प्रा. मारोतराव भोयर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य, ग्रामगीता महाविद्यालय चिमूर, डॉ. सुनंदा आस्वले व डॉ. भालचंद्र लोढे उपस्थित होते. प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश्वर रहांगडाले यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे अहवाल वाचन केले. सूत्रसंचालन प्राध्यापिका नीलिमा तुराणकर, आभार प्राध्यापक गजानन चव्हाण यांनी केले. सायंकाळी 4.00 वाजता राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थ्यांचे गावाकडे प्रस्थान झाले.

निवडक छायाचित्रे


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 19.236" N
Longitude
79° 29' 53.166" E
Local 02:03:12 PM
Altitude 162.3 meters
GMT 08:33:12 AM
Thursday, 12.25.2025
Note: Nss cam Inauguration R.T. college Chimur Dist chandrpur


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 19.17" N
Longitude
79° 29' 53.25" E
Local 03:05:05 PM
Altitude 159 meters
GMT 09:35:05 AM
Thursday, 12.25.2025
Note: Nss cam Inauguration R.T. college Chimur Dist chandrpur




GPS Map
Camera Lite
Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 22.686" N
Longitude
79° 29' 47.772" E
Local 09:26:57 AM
Altitude 168.8 meters
GMT 03:56:57 AM
Friday, 12.26.2025
Note: Nss camp R.T. college Chimur Dist chandrpur


GPS Map
Camera Lite
FFFX+5CC, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 23.334" N
Longitude
79° 29' 56.406" E
Local 09:51:33 AM
Altitude 171.4 meters
GMT 04:21:33 AM
Friday, 12.26.2025
Note: ग्राम परिसर स्वच्छताNss camp R.T. college Chimur Dist chandrpur


राष्ट्रीय सेवा योजना


11:16
Shirpur
25 December 2025, 18:29
GPS Map
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 19.206" N
Longitude
79° 29' 53.19" E
Local 06:29:28 PM
Altitude 168.3 meters
GMT 12:59:28 PM
Thursday, 12.25.2025
Note: सामुदायिक प्रार्थना Nss camp R.T. college Chimur Dist chandrpur
Send
Favourite
Edit
Delete
More


GPS Map
Camera Lite
FFCX+Q56, शिरपुर, महाराष्ट्र 442904, भारत
Latitude
20.47205003°
Longitude
79.49811769°
Local 10:48:47 AM
GMT 05:18:47 AM
Altitude 230 meters
Monday, 29.12.2025
Note : राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, रा से यो निवासी शिबिर मौजा शिरपूर येथे दिनांक २९/१२/२०२५ ला आरोग्य तपासणी शिबिर


GPS Map
Camera Lite
FFCX X94, Main Road, Shirpur, Maharashtra 442904, भारत
Latitude
20.47237221°
Longitude
79.49779912°
Local 09:52:04 AM
GMT 04:22:04 AM
Altitude 230 meters
Monday, 29.12.2025
Note : राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, रा से यो निवासी शिबिर मौजा शिरपूर येथे दिनांक २९/१२/२०२५ ला पशुवैद्यकीय तपासणी शिबिर


राष्ट्रीय सेवा




GPS Map
Camera Lite
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 18.486" N
Longitude
79° 29' 53.328" E
Local 03:25:04 PM
Altitude 163.7 meters
GMT 09:55:04 AM
Tuesday, 12.30.2025
Note: समारोपीय समारंभ Nss camp R.T. college Chimur Dist chandrpur


राष्ट्रीय सेवा योजना
GPS Map
Camera Lite
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 19.29" N
Longitude
79° 29' 53.22" E
Local 02:46:53 PM
Altitude 148.5 meters
GMT 09:16:53 AM
Tuesday, 12.30.2025
Note: समारोपीय समारंभ Nss camp R.T. college Chimur Dist chandrpur


राष्ट्रीय सेवा
GPS Map
Camera Lite
FFCX+Q56, Shirpur, Maharashtra 442904, India
Latitude
20° 28' 19.284" N
Longitude
79° 29' 53.604" E
Local 03:08:29 PM
Altitude 172.3 meters
GMT 09:38:29 AM
Tuesday, 12.30.2025
Note: समारोपीय समारंभ Nss camp R.T. college Chimur Dist chandrpur

निवडक वर्तमानपत्रातील कात्रणे

सोहळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालयाचा पुढाकार, १०० रासेयो सहभाग

राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे निवासी शिबिर

चिमूर, (ता. प्र.). राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय चिमूर येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे निवासी शिबिर ग्रा. शिरपूर येथे २४ ते ३० डिसेंबरपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन गुरुवारी (दि. २५) करण्यात आले.



उद्घाटन सोहळा, ग्रामपंचायत सदस्य तथा ग्रामविकास अधिकारी लोकचंद भासारकर, अर्चना मोहुर्ले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रा. डॉ. प्रफुल्ल राजुरवाडे, डॉ. रमेश खोडके तथा प्रा. गुरुदास कामडी यांनी मार्गदर्शन केले. रासेयो निवासी शिबिराची भूमिका प्रा. डॉ. पितांबर पिसे तर प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रफुल्ल राजुरवाडे यांनी केले. संचालन प्रा. गजानन चव्हाण, आभार डॉ. राजेश्वर रहांगडाले यांनी मानले.

पहाटेची शिरपूर ग्रामस्थ, राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १०० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते. पालकभेटीसाठी प्रा. नितीश तुलावकर, प्रा. सुशांत वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

कठीण संघर्षातून मानवी क्षमता विकसित होतात

रासेयो स्वयंसेवकांनी चिरकालीन कार्य केले पाहिजे. त्यांनी गावातील समाजाशी जोडले पाहिजे. संघर्षाशिवाय विकास साध्य नाही. कठीण संघर्षातून मानवी क्षमता विकसित होतात, असे मार्गदर्शन डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी समकालीन ग्रामीण्ही रोपट्टी हे पुस्तक भेट दिले.

पुण्य नगरी

City Pulse

रासेयो स्वयंसेवकांच्या श्रमदानातून हटविले अतिक्रमण



चिमूर : गांधी सेवा शिक्षण समितीद्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय चिमूर येथील रासेयो निवासी शिबिरातील विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात साफसफाई मोहीम राबविली. मागील कित्येक वर्ष गावातील रस्त्यालगत अतिक्रमण होते. गावातील नाल्या प्लॉस्टीक कचऱ्यामुळे बुजल्या होत्या. रासेयो स्वयंसेवकानी गावातील नालीवरचे अतिक्रमण हटवून रस्त्याचे बांधकाम केले. यासाठी गावातील नागरिकांनी या अभियानात सक्रीय सहभाग घेतला. या अभियानात सरपंच जयपाल गावतुरे, उपसरंपच राजेंद्र भानारकर, ग्रामपंचायत सदस्य लोकचंद भासारकर, पोलीस पाटील मंगेश भानारकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रफुल राजुरवाडे, डॉ. राजेश्वर रहांगडाले, प्रा. गजानन चव्हाण यांचे स्वयंसेवकाना मार्गदर्शन लाभले.

Chandrapur Edition
Dec 30, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

कायदे सक्षम झाल्याशिवाय महिला सुरक्षित नाही : ठाणेदार दिनेश लबडे



चिमूर : स्थानिक गांधी सेवा शिक्षण समितीद्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर येथील रासेयो पथकाद्वारे निवासी शिबिर गटग्रामपंचायत शिरपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात बौद्धीक सत्रात महिला सुरक्षा धोरण आणि उपाययोजना या विषयी ठाणेदार दिनेश लबडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी मार्गदर्शनात समाजात दिवसेंदिवस विकृती वाढत आहे. मागील काही वर्षात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. अत्याचाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी महिलाम्ध्ये कायद्याविषयी जनजागृती हवी आहे. महिलांच्या तक्रारीचे निवारण लगेच झाले पाहिजे. दरम्यान, रासेयो निवासी शिबिरार्थ्यांनी महिला सक्षमीकरणासंदर्भात प्रश्नोत्तरे विचारली. या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जयपाल गावतुरे होते. यावेळी ग्रा.पं. सदस्य वैशाली निकोडे, सुनीता कुमरे, पुष्पा कापगते, प्रतिभा गावतुरे, तंटामुक्ती अध्यक्ष ईश्वर लेनगुरे, शिरपूरचे पोलीस पाटील मंगेश भानारकर आदी उपस्थित होते. संचालन रासेयो स्वयंसेवक आशिष सातपुते, प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश्वर राहांगडाले यांनी केले. आभार करण डहारे यांनी मानले.

Chandrapur Edition
Dec 30, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

City Pulse

शिरपूर येथे ग्रामविकासात लोकसहभाग या विषयावर व्याख्यान



शिरपूर : गांधी सेवा शिक्षण समिती द्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, शिरपूरच्या वतीने शिरपूर येथे आयोजित रासेयो निवासी शिबिरात ग्रामविकासात लोकसहभागावर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान जयपाल गजबुरे होते. प्रमुख अतिथी समाजसेवी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रशांत इंदूरकर होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात ग्रामविकासासाठी लोकसहभाग हा कणा असून गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वाची असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून दिनेश चामटे यांनी सांगितले की, स्वच्छता, जलसंधारण, वृक्षलागवड, शिक्षण, आरोग्य व सामाजिक सलोखा या क्षेत्रात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग असेल तर शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. केवळ शासकीय योजनांवर अवलंबून न राहता ग्रामसभा, महिला बचत गट, युवक मंडळे व स्वयंसेवी संस्था यांनी एकत्र येऊन विकासाभिमुख उपक्रम राबविणे आवश्यक आहे. रासेयो स्वयंसेवकांनी या सहवासातून ग्रामविकासाशी संबंधित विविध प्रश्न विचारून संवाद साधला. कार्यक्रमाच्या शेवटी लोकसहभागातून स्वच्छ, सक्षम व आत्मनिर्भर गाव घडू शकते, असा संदेश देण्यात आला. संचालन अनिकेत सावसाकडे, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रफुल राजुरवाडे यांनी केले. आभार जान्हवी ढोगे हिने केले. कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश्वर राहांगडाले, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. निलीम दुरगकर, प्रा. वर्षा सोनटक्के, शिक्षकेतर कर्मचारी व रमेश बगडे आदी उपस्थित होते.

Chandrapur Edition
Jan 3, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

लोकमत

शिरपूरमध्ये निवासी श्रमसंस्कार शिबिराचा झाला समारोप



Chandrapur Edition
Page No. 2 Jan 01, 2026
Powered by: erelego.com